**प्रस्तावना:-**

**विषय : - प्रभाग समिती क्रं. 1,2,3,4 मधील झोपडपट्टी विभागातील लिपीक यांनी माहे जुलै 2023 या वर्षातील रोखलेली एक वेतन वाढ रद्द करुन पूर्ववत करण्या बाबत.**

प्र.स.क्र.१,२,३,४ मध्ये झोपडपटी विभागात लिपीक या पदावर काम करीत असताना झोपडपटटी लिपीक यांना जा.क्र.भिनिशमनपा/करमुल्यांकन/५१६३ ते ५१६६ दि.११/११/२०२२ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

सबब नोटीशीचा खुलासा व कार्यालयीन टिपणी पहाता प्रभाग समिती कार्यालयातील झोपडपट्टी भुभाग लिपिक यांची दिनांक १०/११/२०२२ रोजी वसुलीची टक्केवारी पाहता **० %** **वसुली** असल्याचे वरीष्ठांचे निदर्शनास आले असल्याने वसुलीच्या कामात हजगर्जीपणा केल्या प्रकरणी **महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील)नियम १९७९ चे कलम ५ (१) (चार) नुसार माहे जुलै-२०२३ या वर्षाची एक वेतन वाढ जा.क्र./भिनिशमनपा/आस्था/८००/२०२३ दि.१६/०३/२०२३ रोजीच्या आदेशाने एक वर्षाकरीता वेतनवाढ रोखने बाबत आदेश देणेत आले होते**

सदर खुलाश्यात नमुद केल्याप्रमाणे दि. १०/११/२०२३ रोजी प्र.स.क्र. १ मधील झोपडपट्टी विभागच्या सदर दिवसाचा भरणा रक्कम रु. २७,५७२/- असा रोख वसुल केला आहे व त्यानंतर मार्च २०२३ अखेर पर्यंत रु. ३,२९७८०५२/- इतका झालेला आहे. सोबत जुलै महिन्याच्या खुलासात कराच्या पावत्यांच्या छायांकित प्रती जोडल्या आहेत. त्यांनी माहे जुलै २०२३ ची वेतनवाढ न रोखणेबाबत विनंती केली आहे.

१. श्री.साहेबराव चौधरी, लिपीक, झोपडपटटी विभाग प्र.स.क्र.१
२. श्री.अक्षय सुनिल जाधव लिपीक, झोपडपटटी विभाग प्रभाग समीती क्रमांक ०१
३ श्री..विनोद निकम लिपीक, झोपडपटटी विभाग प्र.स.क्र.१
४.श्री.गंगाराम पवार,लिपीक झोपडपटटी विभाग प्र.स.क्र.१
५.श्री. धर्मेंद्र शेलार, लिपीक झोपडपटटी विभाग प्र.स.क्र.१
६.श्री.शरद सुरेश भवार, लिपीक झोपडपटटी विभाग प्र.स.क्र.१
७.श्री.राजेद्र निरंजन गायकवाड, लिपीक झोपडपटटी विभाग प्र.स.क्र.२
८. श्री.अशोक बंन्सीलाल पवार लिपीक, झोपडपटटी विभाग प्रभाग समीती क्रमांक ०२
९.श्री.भालचंद्र कुंडकर, लिपीक, झोपडपटटी विभाग प्रभाग समीती क्रमांक ०२
१०.श्री.मिलिंद म्हात्रे लिपीक, झोपडपटटी विभाग प्रभाग समीती क्रमांक ०२
११.श्री.राजाराम कदम लिपीक, झोपडपटटी विभाग प्रभाग समीती क्रमांक ०२
१२.श्री.अशोक थिटे, लिपीक, झोपडपटटी विभाग प्रभाग समीती क्रमांक ०२

तरी वरील प्रमाणे लिपीक यांची थांविण्यात आलेली वेतन वाढ १ वर्षाकरीता पुर्ववत करणे बाबत मा. आयुक्त महोदय यांनी मौखिक निर्देश दिलेले आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)नवि-14 दि.06 जून 2022 रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 452 अ च्या (अ) व (ब) मधील तरतुदीनुसार प्रशासकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक सो. यांना

आहेत.त्यानुसार १२ कर्मचारी यांची एक वर्ष रोखण्यात आलेली वेतनवाढ पूर्ववत करणे बाबत उचित आदेशास सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्र.** २३२ **दिनांक :-** १३/ ०७ /२०२३.

प्र.स.क्र.१,२,३,४ मध्ये झोपडपटी विभागात लिपीक या पदावर काम करीत असताना झोपडपटटी लिपीक यांना जा.क्र.भिनिशमनपा/करमुल्यांकन/५१६३ ते ५१६६ दि.११/११/२०२२ अन्वये वसुलीची टक्केवारी पाहता ० % वसुली असल्याचे वरिष्ठांच्या निर्देशनास आले असल्याने कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्याबाबत झोपडपट्टी लिपीकांचे खुलासे मागविण्यात आले होते. त्या नुसार त्यांची एक वेतनवाढ थांबविण्यात आली होती ती पूर्ववत करणे बाबत.

शासन आदेश क्रमांक एमसीओ- २०२०/प्र.क्र.७२ (भाग-२नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ च्या (अ) व (ब) मधिल तरतूदीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार का आयुक्त, प्र.स.क्र.१,२,३,४ मध्ये झोपडपट्टी विभागातील लिपीक यांची रोखलेली एक वेतन वाढ पूर्ववत करणेबाबत. या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी नि.श. महानगरपालिका**